# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

नॅक समिती तर्फे अ दर्जा प्राप्त


पदव्युत्तर कार्यालय : ०२४०- २४०३१२३
बीसीयूडी कार्यालय : ०२४०- २४०३२२३
कुलसचिव कार्यालय : ०२४०- २४०३३३४
फॅक्स बीसीयूडी : ०२४०- ३२२४ / ३३३५
ई-मेल कार्यालय : bcud.office@bamu.ac.in
pgsection@bamu.ac.in
संकेतस्थळ : http://bamu.ac.in

विद्यापीठ परिसर,
औरंगाबाद- ४३१ ००४
(महाराष्ट्र)


## परिपत्रक

मा. कुलगुरु महोदय यांच्या आदेशानुसार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सर्व विभाग प्रमुख व अध्यापकांच्या मा. कुलगुरुंच्या अध्यक्षतेखाली दिनांक २० मे २०१६ रोजी दुपारी ४.०० वाजताझालेल्या बैठकीत विद्यापीठाच्या शैक्षणिक कॅलेंडर बाबतीत साधक-बाधक चर्चा होऊन महाराष्ट्र व मराठवाड्यात आलेली तीव्र स्वरुपाची उष्णतेची लाट, गंभीर अशी दुष्काळाची परिस्थिती यांचा विचार करुन खालील निर्णय एकमताने घेण्यात आले.

१) २०१६-२०१७ च्या नव्या शैक्षणिक वर्षामध्ये सर्व पदव्युत्तर विभागांची प्रवेश प्रक्रिया, प्रवेशपूर्व परीक्षा (CET) घेऊन दिनांक २६ जून २०१६ पर्यंत पूर्ण करावी व २७ जून २०१६ पासून नियमीत वर्ग घेण्यास आरंभ करण्याचे ठरविण्यात आले.

२) प्रवेशपूर्व परीक्षा (CET) घेण्याचे स्वातंत्र्य विभागांना देण्यात आले असून विभागीय समिती प्रवेशपूर्व परीक्षेची तारीख निश्चित करतील व सर्व प्रवेश प्रक्रिया दि २६ जून २०१६ पर्यंत पूर्ण करतील. सर्व विभाग आपल्या प्रवेशपूर्व परीक्षेचा कार्यक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर घोषित करतील.

३) विभागाच्या प्रवेशासाठी नोंदणी विद्यार्थ्यांनी दि. १४ जून २०१६ पर्यंत करावी व ज्या विभागांच्या प्रवेशपूर्व परीक्षा या आधी निश्चित झालेल्या आहेत व त्यांची पुरेशी नोंदणी झालेली आहे ते विभाग त्यांच्या विभागीय समितीद्वारे प्रवेशपूर्व परीक्षा घेण्याचा निर्णय घेऊ शकतील. तशी घोषणा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर व विभागाच्या नोटीसबोर्डवर करण्यात येईल.

*विद्यापीठ प्रांगण,* ][
*औरंगाबाद* ][
*पी.जी./प्रवेश/२०१६-२०१७/3511-3556* ][
*परिपत्रक क्रमांक-०४* ][
*दिनांकः- २० मे, २०१६* ][

***मा. संचालक,***
***महाविद्यालये व विद्यापीठ***
***विकास मंडळ.***

<u>या परिपत्रकाची प्रत:-</u>

१) सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

२) संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, उस्मानाबाद.

३) सर्व विभाग प्रमुख, शैक्षणिक विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, उप-परिसर, उस्मानाबाद.